सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता - पाचवी

विषय - मराठी

(द्वितीय भाषा)

सुलभभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२



ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू अभ्यास (ब्रिज कोर्स) : इयत्ता पाचवी (द्वितीय भाषा -मराठी)

- **प्रवर्तक** : **शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन**
- **प्रकाशक** : **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**
- **प्रेरणा** : **मा. वंदना कृष्णा, (भा.प्र.से.)**
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा.विशाल सोळंकी, (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (भाषा व समता विभाग)**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे, विषय सहायक, मराठी विभाग,**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती गटप्रमुख** : **डॉ. राजेश बनकर, वरिष्ठ अधिव्याख्याता ,**
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

निर्मिती सदस्य

१) नरेंद्रकुमार रायकर, पदवीधर शिक्षक,
जि.प. प्राथ.शाळा रौंधळवाडी,ता.खेड, जि. पुणे

२) वैशाली डेरे, सहायक शिक्षक,
कै.मामासाहेब मोहोळ विद्यामंदिर,म.न.पा.शाळा क्र.९४बी,पुणे

३) रमेश गुरगुडे, सहायक शिक्षक
जि.प.शाळा थेरगाव, ता. निफाड,जि. नाशिक

४) दिपाली पेद्दे, सहायक शिक्षक
बुलढाणा केंब्रिज स्कूल, बुलढाणा

५) मधुरा सोहनी , सहायक शिक्षक
जि. प. प्राथ. शाळा सावर्डे कासारवाडी ,ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

६) डॉ. संदीप तुपे, सहायक शिक्षक
शिवाजी हायस्कूल,औरंगाबाद

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

1. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे.
2. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा.
3. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात.
4. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.
5. सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून यामध्ये १५ व्या दिवशी पहिली ३० व्या दिवशी दुसरी व ४५ व्या दिवशी तिसरी याप्रमाणे तीन चाचण्यांचा समावेश आहे.
6. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. शेवटी दिलेल्या उत्तरसूचीच्या मदतीने आपल्या उत्तरांची खात्री करा.
7. चला सराव करू या व सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**, त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या',** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.
- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवावे याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्र यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या **विद्यार्थी मित्र** व **शिक्षक मार्गदर्शिका** यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा .
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.

सेतू अभ्यासच्या अंमलबजावणी व वापराकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा !

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यासक्रम कृती आराखडा

इयत्ता – पाचवी **विषय – द्वितीय भाषा -मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

➢ उद्दिष्टे

१.कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.

२.विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.

३.विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.

४.विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.

५.विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अपेक्षित क्षेत्र /कौशल्य

1. **श्रवण**
2. **भाषण –संभाषण**
3. **वाचन**
4. **लेखन**
5. **भाषाभ्यास (कार्यात्मक व्याकरण)**

अनुक्रमणिका

दिवस	संकल्पना	पृष्ठ क्रमांक	दिवस	संकल्पना	पृष्ठ क्रमांक
१	गोष्ट सांगणे,ऐकविणे	8	२४	जोडशब्द	31
२	संवाद ऐकवणे,संवाद सादरीकरण	9	२५	पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे वाचन	32
३	चित्रवर्णन	10	२६	बातमी वाचन	33
४	चित्रवाचन	11	२७	शब्दशोध	34
५	ऐकलेल्या गोष्टी सांगणे	12	२८	जाहिरात वाचन	35
६	औपचारिक व अनौपचारिक गप्पा मारणे	13	२९	यमक जुळणारे शब्द	36
७	कविता गायन व आकलन	14	३०	चाचणी क्रमांक -२	37
८	मुक्त संवाद	15	३१	नाट्यीकरण	38
९	चित्राच्या जागी शब्द ठेऊन वाचन	16	३२	सूचना फलक	39
१०	जोडाक्षरयुक्त (‘र’च्या खुणा) शब्द वाचन	17	३३	संवाद आकलन	40
११	प्रकट वाचन -१	18	३४	घटनाक्रम सांगणे	41
१२	प्रकट वाचन -२	19	३५	प्रश्नचिन्ह	42
१३	माहितीवरून,चित्रावरून गोष्ट सांगणे	20	३६	संवाद वाचन	43
१४	उतारा वाचन	21	३७	शब्दांवरून माहिती लेखन	44
१५	चाचणी क्रमांक -१	22	३८	अनुभव लेखन	45
१६	अनुभव कथन	23	३९	उतारा व त्यावरील प्रश्न -उत्तरे लेखन	46
१७	विनोद वाचन	24	४०	लिंग	47
१८	कविता गायन	25	४१	एक -अनेक (वचन)	48
१९	गोष्ट सांगणे	26	४२	वस्तू विशेष लेखन	49
२०	कविता वाचन	27	४३	निरोप लिहू या	50
२१	चित्रावरून माहिती सांगणे	28	४४	शुभेच्छा पत्र लेखन	51
२२	स्वल्पविराम	29	४५	चाचणी क्रमांक -३	52
२३	पूर्णविराम	30	-	-	-

१

इयत्ता- पाचवी विषय- द्वितीय भाषा-मराठी

क्षेत्र-श्रवण,भाषण संकल्पना- गोष्ट सांगणे,ऐकविणे

अध्ययन निष्पत्ती-

इतरांकडून सांगितली जाणारी गोष्ट लक्षपूर्वक ऐकून त्यावर आपले मत व्यक्त करतात व प्रश्न विचारतात.

जाणून घेऊ या

१) शिक्षक /पालकांनी मुलांना तोंडी एक गोष्ट सांगावी किंवा पुस्तकातून गोष्ट वाचून दाखवावी.
२) शिक्षक/पालकांनी मुलांना एक गोष्टीचा व्हिडीओ दाखवावा .
३) गोष्टीवर सोपे प्रश्न विचारावे.
(मुलांचे भावविश्व, परिसर लक्षात घेऊन गोष्ट निवडावी .)

सक्षम बनू या

१) शिक्षक सुरुवातीला सोपी, कमी पात्र असणारी गोष्ट सांगतील .
२)शिक्षक मुलांना अपूर्ण गोष्ट पूर्ण करायला सांगतात .उदा –ससा आणि कासव
३) शिक्षक मुलांना कल्पना करायला सांगतात. समजा तुम्हीच या गोष्टीत असता तर तुम्ही काय केले असते ?
४)मुलांनी स्वत: एखादी गोष्ट सांगावी .

सराव करू या

१) शिक्षक मुलांना ही गोष्ट आपल्या घरातील लोकांना सांगण्यास सांगतात.
२) गोष्टीत काय आवडले? काय नाही आवडले ?ते मित्रांना सांगा .

२

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र-श्रवण, भाषण **संकल्पना- संवाद ऐकवणे,संवाद सादरीकरण**

अध्ययन निष्पत्ती-

०४.०१.०२ ऐकलेल्या साहित्य प्रकारातील विषय, घटना ,चित्र,पात्र,शीर्षक या विषयी चर्चा करतात ,प्रश्न विचारतात.आपले मत व्यक्त करतात व ते पटवून देताना त्या मागील विचार सांगतात .

जाणून घेऊ या

१) शिक्षक /पालकांनी मुलांना डॉक्टर व पेशंट यांच्यातील संवाद ऐकवावा.

२)शिक्षक/पालकांनी मुलांना youtube वरील संवादाचा व्हिडीओ दाखवावा.

३)वरील संवादावर आधारीत प्रश्न विचारावे .

४)ऐकलेल्या संवादात कोणकोणत्या गोष्टीचा उल्लेख आलेला आहे ते सांगा.

सक्षम बनू या

१) शिक्षक /पालक पुढील संवाद सादरीकरण करून घेतात.उदा .भाजी विक्रेता व ग्राहक ,दुधवाला व ग्राहक


२) आपण डॉक्टर कडे का जातो? ते सांगा.

३) कोविड- १९ हा आजार कसा पसरतो ?याची आपल्या मित्राबरोबर चर्चा करा .

४)तुमच्या घरात घडणारे संवाद सादर करा.जसे आई –वडील ,काका –काकू

सराव करू या -

खालील चित्र पहा व त्यातील पक्षी, प्राणी एकमेकांशी काय संवाद करत असतील ते आई-वडिलांना सांगा ?



३

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना-चित्रवर्णन**

अध्ययन निष्पत्ती-

०४ .०१ .०४ – स्वतःचे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात .


जाणून घेऊ या

१)शिक्षक /पालकांनी मुलांना दिलेल्या चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे .

२)शिक्षक / पालकांनी पूर्वज्ञान,समज तपासण्यासाठी प्रश्न विचारावे .

जसे -१)चित्र कोणत्या सणाचे आहे ?

२)चित्रात काय -काय दिसत आहे ?



सक्षम बनू या

१)शिक्षक/ पालकांनी मुलांना वेगवेगळ्या प्रसंगाचे चित्रे पुरवावे. व त्यावर प्रश्न विचारतात.

जसे –बाजार, शाळा ,मंदिर इ

२)शिक्षक / पालकांनी मुलांना चित्र दाखवावे,व चित्राचे वर्णन सोप्या शब्दात करून घ्यावे.



३)विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व विचारशक्तीला वाव द्यावा .

सराव करू या

१)कोणत्याही एका चित्राचे निरीक्षण करून माहिती घरातील व्यक्तींना सांगा?

४

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना- चित्रवाचन**

अध्ययन निष्पत्ती-

०४-०१-०६ –वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी /लेखी स्वरुपात व्यक्त करतात .

जाणून घेऊ या

१)शिक्षक /पालकांनी मुलांना चित्र दाखवावे व त्यावर सोपे प्रश्न विचारावे.

उदा -१)चित्रातील प्रसंग कशाचा आहे ?

२)आई व मुलगा काय घेत आहे ? इ .



सक्षम बनू या

१)शिक्षक / पालकांनी मुलांची माहिती सांगण्याची क्षमता विकसित करण्यासाठी चित्रावरून चित्रगप्पा कराव्यात.

२)शिक्षक / पालकांनी मुलांकडून चित्रातील प्रसंगाचे वर्णन करून घ्यावे .



३)शिक्षक / पालकांनी मुलांना बातमी, संवाद वाचून दाखवावीव चित्रगप्पा कराव्यात.

सराव करू या

१)मित्रांबरोबर वर्तमान पत्रातील चित्र बघून गप्पा मारा ?

२)तुम्ही घरी आई वडिलांना गोष्ट सांगा ?

५

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना-ऐकलेल्या गोष्टी सांगणे**

अध्ययन निष्पत्ती-

०४.०१.०३. कथा, कविता किंवा इतर साहित्याविषयी सांगतात त्यांत आपल्या विचारांची भर घालतात.

जाणून घेवू या

१) शिक्षक /पालकांनी मुलांना त्यांनी ऐकलेल्या गोष्टीं विषयी विचारावे .

जसे –टोपीवाला व माकडे,

प्रश्न -१)टोपीवाला टोपी का विकत होता?

२)माकडांनी टोप्या खाली का टाकल्या ?

(प्रश्न सोपे व रंजक असावे.)

या प्रमाणे आणखी काही गोष्टी घेतात.

सक्षम बनू या

१) शिक्षक किंवा पालकांनी मुलांना ऐकलेल्या गोष्टी बद्दल तोंडी प्रश्न विचारावेत .

२)) शिक्षक किंवा पालकांनी मुलांना गोष्टीतील प्रसंग कथन करायला सांगावे.

३) शिक्षक किंवा पालकांनी मुलांना एक अपूर्ण गोष्ट सांगावी व ती त्यांच्याकडून पूर्ण करून घ्यावी . उदा. – लाकूडतोड्या

सराव करू या

१) ऐकलेल्या गोष्टींचे नाट्यीकरण तयार करावे ?

२) तुयल आवडणारी एक गोष्ट तुमच्या मित्राला सांगा ?

६

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना-औपचारिक व अनौपचारिक गप्पा मारणे**

अध्ययन निष्पत्ती-

०४.०१.०५- विविध प्रकारचे साहित्य (उदा –वर्तमानपत्रांतील बातम्यांचे शीर्षक,बालसाहित्य) यामध्ये आलेल्या नैसर्गिक, सामाजिक तसेच इतर बाबी संवेदनशीलतेने समजून घेऊन त्यावर चर्चा करतात.

जाणून घेऊ या

१)शिक्षक /पालक मुलांना बोलते करतात.जसे –लॉक डाऊन मध्ये तू काय-काय केले ?

२)शिक्षक /पालक मुलांना वर्तमान पत्रातील एक बातमी वाचून दाखवतात.
त्यावर विद्यार्थ्यांचे मते जाणून घेतात.

३)शिक्षक /पालक मुलांनी वाचलेल्या पुस्तकावर गप्पा घेतात.

सक्षम बनू या


१) शिक्षक /पालक मुलांचे दोन गट करून चर्चा घेतात .
उदा –मोबाईल चे फायदे /तोटे

२) शिक्षक /पालक मुलांना शब्द देऊन त्याविषयी बोलण्यास सांगतात.
जसे – झाड, पेन ,शाळा,

३)शिक्षक /पालक मुलांना " ऑनलाईन व ऑफ लाईन" शिक्षण या विषयावर बोलण्यास सांगतात.

सराव करू या

खालील बातमी वाचून त्यावर चर्चा करा व प्रश्नाची उत्तरे सांगा .


१९९९ च्या विश्वचषक स्पर्धेतील सामने सुरू असताना सचिनचे वडील प्रा. रमेश तेंडुलकर यांचे निधन झाले. सचिन थोड्याच काळासाठी इंग्लंडहून भारतात आला आणि लगेचच स्पर्धेसाठी परत गेला. केनियाविरुद्धच्या पुढील सामन्यात त्याने नाबाद शतक केले. (१०१ चेंडूंत १४० धावा.) हे शतक त्याने आपल्या वडिलांना अर्पण केले.

१)सचिनच्या वडीलांचे नाव काय होते ?

२)सचिनने हे शतक कोणाला अर्पण केले ?

७

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण ,भाषण **संकल्पना-कविता गायन व आकलन**

अध्ययन निष्पत्ती-

०४.०१.०३ –कथा ,कविता किंवा इतर साहित्याविषयी सांगतात त्यांत आपल्या स्वतःच्या विचारांची भर घालतात .

जाणून घेऊ या

१) शिक्षक /पालकांनी कवितेवर सोपे प्रश्ंन विचारावे .

जसे –१)तीन प्रमुख ऋतू कोणते ? २)शेकोटी कोणत्या ऋतूत पेटवली जाते?



२)शिक्षक /पालकांनी कवितेचे साभिनय सादरीकरण करून घ्यावे .

सक्षम बनू या

१) शिक्षक/पालक कवितेचे स्पष्टीकरण करतांना मुलांना तोंडी सोपे प्रश्न विचारतात .

२)शिक्षक /पालक मुलांना youtube वर "सुगी" कवितेचा व्हिडीओ दाखवितात .

३)शिक्षक /पालक मुलांकडून वैयक्तिक व सामुहिक कविता गायन करून घेतात .

४)अन्नधान्य योग्य पद्धतीने वापरले जावे,याची जाणीव सर्वांना करून देण्यासाठी घोषवाक्य तयार करून सांगा.

सराव करू या

१)एक बी असलेली फळे व अनेक बिया असलेली फळे यांची नावे सांगा ?

२)शेतात कोणकोणती पिके घेतली जातात ?

८

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना-मुक्त संवाद**

अध्ययन निष्पत्ती-

०४.०१.०४ –स्वतःचे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.

जाणून घेऊ या

१)शिक्षक /पालकांनी मुलांना वेगवेगळे विषय द्यावेत , त्यावर प्रश्न विचारावे .

उदा –झाड ,शाळा इ .

२) शिक्षक /पालकांनी मुलांना शक्य असल्यास सकारात्मक गोष्टींवरील व्हिडीओ दाखवावेत. त्यावर प्रत्येक मुलाचे मत जाणूहन घ्यावे.

सक्षम बनू या

१) शिक्षक /पालकांनी मुलाची स्वतःची ओळख कशी करून द्यावी हे सांगतात.

२) शिक्षक /पालकांनी चित्रे दाखवावीत व त्यावर मुलांना मुक्त बोलू द्यावे .उदा. खालील चित्रे





३)शिक्षकांनी /पालकांनी आपल्या कल्पकतेने आणखी विषय उपलब्ध करून द्यावेत .

सराव करू या

१) खालील विषयावर गटात, घरात,मित्रांबरोबर संवाद करा .(मुक्त बोला)

१)कोरोना

२)आपले कुटुंब

३)मोबाईल

१

इयता –पाचवी विषय – द्वितीय भाषा – मराठी

क्षेत्र-वाचन संकल्पना –चित्राच्या जागी शब्द ठेऊन वाचन

अध्ययन निष्पत्ती –

४.१६.६वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी स्वरुपात व्यक्त करतात.

४.१६.९वाचायला उत्सुक असतात आणि वाचन कोपरा / ग्रंथालयातील आपल्या आवडीची पुस्तके निवडतात. व त्याचे वाचन करतात.

जाणून घेऊया - शिक्षकांनी / पालकांनी मुलांना खालील चित्र पहाण्यास सांगून त्याखालील शब्द वाचण्यास सांगावे .







जहाज चिमणी बैल गुलाब मोर

सक्षम बनूया – शिक्षकांनी /पालकांनी मुलांना खालील वाक्यातील चित्रांच्या जागी शब्द घालून वाक्य वाचण्यास सांगावे.आवश्यक तिथे मार्गदर्शन करावे.

एक होती आजी .तिला करायची होती  ची भाजी .  घेऊन ती गेली बाजारात .बाजारातून तिने आणला  .

आजीने घेतली  .  कापला  ने .  ठेवली शेगडीवर .  त ओतले तेल. त्यात टाकली  व  .  ची भाजी झाली मस्त . आजीने केली फस्त.

. **सराव करूया - विद्यार्थ्यांनी खालील प्रश्न वाचून सोडवावेत.**

अ) खालील शब्द वाचा व समजून लिहा.

१)  पूर = ---------- २)  गाव = ---------- ३)१२ मती = ---------- ४)  गाव = ----------

ब) पुढील वाक्य समजून वाचा व वहीत लिहा.

१) आकाशात  उडत होती.

२)  जंगलाचा राजा आहे.

३)  पिवळ्या रंगांची असतात.

४)  ला  खूप आवडते .

५)आमच्या  चे नाव मोत्या आहे.

इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

१०

क्षेत्र –वाचन **संकल्पना –जोडाक्षरयुक्त (‘र’च्या खुणा) शब्द वाचन**

अध्ययन निष्पत्ती –४.१६.९ वाचायला उत्सुक असतात आणि वाचन कोपरा /ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

जाणून घेऊया – शिक्षकांनी /पालकांनी मुलांना पुढील जोडाक्षरयुक्त शब्द वाचण्यास सांगावे व ‘ र’ च्या खुणेभोवती गोल करण्यास सांगावे.



सक्षम बनूया –१) शिक्षकांनी / पालकांनी मुलांना पुढील जोडाक्षरांचे उच्चार कसे होतात हे करून दाखवावे . ते उच्चार मुलांकडून पुन्हा पुन्हा म्हणून घ्यावेत.आवश्यक त्याठिकाणी मार्गदर्शन करावे. त्यानंतर लाल रंगातील शब्दांचे वाचन करून घ्यावे.

१) प् + र = प्र (**प्राण**)
२) क् + र = क्र (**क्रमांक**)
३) श + र = श्र (**श्रावण**)
४) त् + र = त्र (**त्रास**)
५) ट् + र = ट्र (**ट्रेन**)
६) ऱ् + व = र्व (**सर्व**)
७) र् + य = र्य (**कुऱ्हाड**)

२) शिक्षकांनी / पालकांनी मुलांकडून पुढील शब्दांचे योग्य उच्चारासहित वाचन करून घ्यावे.

प्रगती	नम्रता	श्रम	सत्र	राष्ट्रीय	चर्चा	वऱ्हाड
सुप्रिया	चक्र	आश्रम	कुत्रा	ड्रम	पर्वत	बऱ्याच
प्रणाम	चंद्र	श्रमिक	मित्र	महाराष्ट्र	वर्ग	खाऱ्या

११

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- वाचन **संकल्पना- प्रकट वाचन -१**

अध्ययन निष्पत्ती-

1) ऐकलेल्या साहित्य प्रकारातील विषय,घटना,चित्र, पात्र शीर्षक यांविषयी चर्चा करतात,प्रश्न विचारतात. आपले मत व्यक्त करतात.
2) वाचायला उत्सुक असतात आणि वाचनकोपरा /ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

जाणून घेऊ या

शिक्षक /पालकांनी **मुलांना खालील उताऱ्याचे ठराविक वेळेत वाचन करण्यास सांगावे.**

शाळा सुटली. मी घरी आलो. इकडे तिकडे पाहिले तर आई झोपलेली दिसली. यावेळी ती अशी कधीच झोपत नाही. मी आईजवळ गेलो . "आई तुला बर वाटत नाही का ?" असे विचारत मी तिच्या शेजारी बसलो. आईच्या अंगाला हात लावून पाहिला. आईला खूप ताप आला होता. तिचे अंग तापाने फणफणत होते.

मी लगेच थंड पाणी घेतले. स्वच्छ रुमाल घेतला. तो थंड पाण्यात बुडवला. मी आईच्या कपाळावर रुमालाच्या घड्या ठेवू लागलो. काही वेळाने आईचा ताप थोडासा कमी झाला. मी डॉक्टरांकडे गेलो. त्यांना घरी घेऊन आलो. डॉक्टरांनी आईला तपासले. औषधे लिहून दिली. मी आईला चहा करून दिला. थोड्या वेळाने आईला झोप लागली. मी घर आवरले. घर स्वच्छ आवरून घेतले

तेवढ्यात बाबा आले. त्यांनी डॉक्टरांनी दिलेली औषधे आणली. आईला दिली. आता आईला थोडे बरे वाटू लागले. आई उठून बसली. बाबा म्हणाले, " तू उठू नकोस. आराम कर. जेवणाच मी बघतो." आईच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. आईचा आनंदी चेहरा पाहून आम्हालाही आनंद झाला.



शिक्षक /पालकांनी वरील उताऱ्याचे समजपूर्वक वाचन झाले किंवा नाही यासाठी आकलनावर आधारित प्रश्न विचारावेत
उदा : कोण ते लिहा : 1) तापाने फणफणारी : ----------2) औषधे आणणारे : ---------3) आईला तपासणारे : ----------

सक्षम बनू या

1) शिक्षकांनी मुलांना आदर्श प्रकट वाचन कसे असावे ते करून दाखवावे.
2) मुलांना वाचन करताना प्रत्येक ओळीवर लक्ष देण्यास सांगावे.
3) जोडाक्षरयुक्त शब्द फळ्यावर लिहावे.
4) उताऱ्यात आलेल्या विरामचिन्हांची ओळख मुलांना करून देऊन त्यानुसार अर्थपूर्ण वाचन कसे करावे हे सांगावे.
5) शब्दांचा स्पष्ट व शुद्ध उच्चार यासंदर्भात चर्चा करावी .

सराव करू या

1) पाठयपुस्तकात विरामचिन्हे असलेले छोटे छोटे उतारे मुलांना प्रकट वाचनासाठी द्यावेत.
2) गोष्टींची छोटी छोटी पुस्तके किंवा वर्तमानपत्रात आलेले छोटे उतारे मुलांना देऊन वाचनाचा सराव करून घ्यावा.
3) आवाजातील चढउतार असलेली वाक्ये वेगळी लिहून त्याचा सराव घ्यावा.

१२

इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

क्षेत्र –वाचन **संकल्पना – प्रकट वाचन -२**

अध्ययन निष्पत्ती –

04 .16 .09 वाचायला उत्सुक असतात आणि वाचन कोपरा /ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

जाणून घेऊया –

शिक्षकांनी /पालकांनी मुलांकडून खालील उताऱ्याचे प्रकट वाचन घ्यावे. वाचत असताना त्यांचे निरीक्षण करावे .

उतारा: **माझे आवडते फूल चाफा आहे.त्याचा सुवास मला आवडतो.माझे आवडते फळ आंबा आहे.पिकलेला आंबा गोड असतो.माझा आवडता पक्षी मोर आहे.त्याचा मनमोहक पिसारा मनाला भुरळ पाडतो.माझा आवडता प्राणी कुत्रा आहे.कुत्रा इमानी असतो.**

सक्षम होऊ या –

१)शिक्षकांनी / पालकांनी पुढील उताऱ्यातील एकेक शब्दांचे सुस्पष्ट व अचूक उच्चारांसह वाचन करत स्वतः च्या पाठीमागे वाचन करायला सांगावे.

२)विद्यार्थी उच्चार करताना अडखळत असेल किंवा वाचनात मागे पडत असेल तर त्याच्याकडून वाचनाचा अधिक सराव करून घ्यावा.

उतारा: **उन्हाळा,पावसाळा व हिवाळा हे तीन मुख्य ऋतू आहेत.उन्हाळ्यात खूप उकाडा होतो.पावसाळ्यात पावसाच्या सरी पडतात.हिवाळ्यात थंडीचा मोसम असतो.उन्हाळ्यात सुती कपडे वापरावेत .पावसात ओले होऊ नये,म्हणून छत्री, रेनकोट वापरतात.हिवाळ्यात लोकरी,उबदार कपडे घालावेत.ऋतूनुसार आहारात ही बदल करावेत.**

सराव करू या –

१)मोठ्या भावाच्या / आईच्या मदतीने वर्तमानपत्रातील मजकुराचे वाचन करावे.

२)YouTube वरील विविध कथा ऐका व त्याच वेळी स्क्रीनवर दिसणाऱ्या मजकुराचे वाचन करा.

१३

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- श्रवण,भाषण **संकल्पना- माहितीवरून,चित्रावरून गोष्ट सांगणे.**

अध्ययन निष्पत्ती-०४.०१.०४ ऐकलेल्या साहित्य प्रकारातील विषय, घटना,चित्र,पात्र ,शीर्षक याविषयी चर्चा करतात,प्रश्न विचारतात,आपले मत व्यक्त करतात व ते पटवून देताना त्यामागील विचार सांगतात .

जाणून घेऊ या

१) शिक्षक /पालकांनी मुलांना वेगवेगळे गोष्टीचे संदर्भ लक्षात घेवून माहिती सांगावी .
जसे – ससा आणि कासव, चतुर कावळा इ. यावर सोपे प्रश्न विचारावे .
२)शिक्षक /पालकांनी मुलांना वेगवेगळे चित्रे दाखवावे .त्यावर प्रश्न विचारावे .
(शिक्षक/ पालकांनी आपल्या कल्पकतेप्रमाणे चित्रे घ्यावीत.)

सक्षम बनूया

१) शिक्षक /पालकांनी मुलांना शब्द द्यावेत.व त्यावर गोष्ट सांगण्यास सांगावे.मुलांना यासाठी मार्गदर्शन करावे.
उदा - मेंढपाळ ,लांडगा,
२) शिक्षक /पालक यांनी मुलांना एखाद्या गोष्टीचा आशय असलेलली चित्रे दाखवावीत.त्यावर गोष्ट तयार करण्यास सांगावे. मुलांना यासाठी मार्गदर्शन करावे .








सराव करू या

१) खालील माहिती /मुद्यांवरून गोष्ट तयार करा व घरी सांगा?

घनदाट जंगल- वाघ आणि त्याचे पिल्लू-पिल्लू बोलत नाही- बोलायला शिकण्यासाठी मांजराची नेमणूक- म्याऊ म्याऊ शिकण्याचा प्रयत्न -वाघोबा वैतागतो -आता शिकायला गाढवदादा बोलवतात- ते किंचाळत सुरुवात करते- पुन्हा वाघोबा वैताग आणि पिल्लू हैराण - एक दिवस पिल्लू जंगलात फिरत असते-दबा धरून बसलेला शिकारी- बंदुकीचा नेम-पिल्लू डरकाळी- शिकारी धूम ठोकतो- वाघोबा खुश.

इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

१४

क्षेत्र –वाचन **संकल्पना – उतारा वाचन**

अध्ययन निष्पत्ती –

04 .16 .09 वाचायला उत्सुक असतात आणि वाचन कोपरा /ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

04.16.10 वाचलेल्या रचनांमधील मुख्य विषय ,घटना,चित्र,पात्र ,शीर्षक यांसंबंधी चर्चा करतात .प्रश्न विचारतात .आपले मत व्यक्त करतात.

जाणून घेऊया - शिक्षकांनी / पालकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे काळजीपूर्वक वाचन करण्यास सांगावे .व उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारावेत .प्रश्नांमध्ये विविधता असावी.

उतारा: आंबा हा फळांचा राजा आहे. कोकणात आंब्याची खूप झाडे आहेत.मंगलकार्यात आंब्याची पाने दारावर लावतात. वसंत ऋतूत आंब्याला मोहोर येतो.कच्च्या आंब्याला कैरी म्हणतात.कैरीपासून लोणचे करतात.पिकलेला आंबा पिवळ्या रंगाचा असतो.त्याच्यापासून आमरस बनवतात. सर्व आंब्यात हापूस आंबा श्रेष्ठ असून त्याला ' कोकणचा राजा ' म्हणतात.

प्रश्न :१)फळांचा राजा कोण?

२)कैरीपासून कोणता पदार्थ बनवतात?

३)कोणत्या ऋतूत आंब्याला मोहोर येतो?

सक्षम होऊ या –

शिक्षकांनी/पालकांनी वरील प्रमाणे विविध विषयावर आधारित उतारे विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून द्यावे.वाचताना कोणती काळजी घ्यायची हे सांगावे..उताऱ्यात आलेल्या घटना ,संवाद आणि आशय या गोष्टी वाचताना समजून घ्यायच्या असतात. हे सांगावे.तसेच उताऱ्यात आलेले नवीन शब्द,जोडशब्द ,वाक्यप्रचार ,म्हणी इ.बाबींकडे वाचताना लक्ष द्यावे ,हे शिक्षकांनी /पालकांनी स्पष्ट करावे .

सराव करू या –

पुढील उतारा वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे वहीत लिहा .

उतारा:

आज चंदुला खूप भूक लागली होती.कारण आज दररोजच्यापेक्षा जरा जास्तच वेळ खेळला होता.आई भर भर चपात्या लाटत होती.चंदू आईसमोर नाचत नाचत मैदानावर केलेल्या गमती जमती सांगत होता.आई स्वयंपाक करता करता चंदूचे बोलणे ऐकत होती.

प्रश्न:१)चंदुला भूक का लागली होती ?

२)आई काय करत होती ?

३)चंदू आईला काय सांगत होता?

४) पुढील शब्दांचे अनेक वचन करा. १) चपाती -..... २)मैदान -.....

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

१५

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -१

विषय – **द्वितीय भाषा-मराठी**

इयत्ता- पाचवी

विद्यार्थ्याचे नाव : - एकूण गुण : १०

प्र.१: पुढील चित्राचे निरीक्षण कर व २-३ वाक्य लिही. गुण -२



प्र.२:खालील वाक्य वाच व त्यातील ' र ' ची खूण असलेल्या शब्दांना गोल कर. गुण-१

काल यशने वर्गात महाराष्ट्राचा नकाशा आणला होता.

प्र.३:तुमची स्वतःची एक चांगली व वाईट सवय लिहा. गुण- २

उत्तर :----------

प्र.४:खालील वाक्यातील चित्राऐवजी शब्द घाला व वाक्य लिहा.


 ने  ची शिकार केली. गुण -१

उत्तर:----------

प्र.५:खालील चित्रातील फरक सांगा. गुण -२



प्र.६:पुढील चित्रे बघ. गोष्टीच्या शेवटी काय घडत असेल त्याचा विचार कर.आणि गोष्ट पूर्ण करून सांग. गुण -२



१६

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण - संभाषण **संकल्पना- अनुभव कथन**

अध्ययन निष्पत्ती-

- 4.16.04 स्वतःचे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात .

जाणून घेऊ या-

- **शिक्षक / पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांचे काही अनुभव कथन करण्यास सांगावे .**

  उदा. १ . तुमच्या गावची यात्रा

  २ . तुम्ही केलेला प्रवास

- **विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवावर आधारित प्रश्न विचारावे .**

सक्षम बनू या-

- **शिक्षकांनी / पालकांनी मुलांना अनुभव सांगतांना कोणत्या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे, ते स्पष्ट करावे.**
- **शिक्षकांनी / पालकांनी अनुभव कथन करून सांगावा.**
- **शिक्षकांनी / पालकांनी एखादा प्रसंग, खेळ , सण सारख्या विषयावर ५/६ वाक्यात अनुभव कथन करण्याची संधी द्यावी .**

सराव करू या-

- **शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून एकमेकांचे अनुभव गटात सांगण्यास सांगावे .**
- **शिक्षक/ पालकांनी मुलांना अनुभव कथनासाठी वेगवेगळ्या विषयाच्या चिट्ठ्या तयार कराव्यात .**

१७

इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

क्षेत्र –वाचन **संकल्पना – विनोद वाचन**

अध्ययन निष्पत्ती – 04 .01 .06 वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव याची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी / लेखी स्वरुपात व्यक्त करतात.

जाणून घेऊया –

शिक्षकानी / पालकांनी मुलांना शेजारील विनोद वाचण्यास द्यावे .विनोद समजला का,हे पहाण्यासाठी शिक्षकांनी /पालकांनी मुलांना पुढील प्रश्न विचारावेत .

प्रश्न :१)हा संवाद कोणामध्ये चालू आहे ?

२)रुग्णाला दुसरा दात का बसवायचा आहे?

३) डॉक्टर रुग्णाचा दात बसवायला का नाही म्हणाले ?

.

वाचा

रुग्ण :माझा एक दात खराब झाला आहे.

डॉक्टर :त्या जागी आपण दुसरा दात बसवूया.

रुग्ण : दात मात्र माझ्या दातासारखा हवा.

डॉक्टर :ते शक्य नाही.

रुग्ण :का ?

डॉक्टर :एवढे घाणेरडे दात माझ्याकडे नाहीत.

नाही

सक्षम बनू या -शिक्षकांनी/ पालकांनी वरीलप्रकारचे विविध विनोद मुलांना योग्य चढ उतारासह वाचून दाखवावे. शिक्षकांनी/पालकांनी विनोद निवडताना मुलांच्या वयाचा विचार करून निवडावा .वाचलेला विनोद मुलांना समजून सांगावा .विनोदी लेखन वाचल्याने आपल्या चेहऱ्यावर हास्याचे भाव येतात .तसेच आपले मनोरंजन होते व आपल्याला आनंद मिळतो. हे विद्यार्थ्यांना सांगावे.

सराव करू या – १)शिक्षकांनी/पालकांनी खालील प्रकारचे चित्रविनोद मुलांना उपलब्ध करून द्यावेत. व त्याचे वाचन घ्यावे.



२) तुम्ही वाचलेले विनोद आईला /भावाला सांगा .

१८

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण - संभाषण **संकल्पना- कविता गायन**

अध्ययन निष्पत्ती-

- 04.16.17 आपल्या कल्पकतेनुसार कविता गायन करतांना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात. त्यात आपल्या स्वतःच्या विचारांची भर घालतात.
- 04.16.03 कथा ,कविता किंवा इतर साहित्याविषयी सांगतांना त्यात आपल्या स्वतःच्या विचारांची भर घालतात.

जाणून घेऊ या-

- शिक्षक / पालकांनी पुढील कविता मुलांकडून म्हणून घ्यावी.

चिऊताई : उठा उठा चिऊताई,सारीकडे उजाडले

डोळे तरी मिटलेले ,अजूनही अजूनही

सोनेरी हे दूत आले ,घरट्याच्या दारापाशी

डोळ्यांवर झोप कशी , अजूनही अजूनही

सक्षम बनू या-

- शिक्षक / पालकांनी एखादी कविता साभिनय म्हणून दाखवावी.
- कविता म्हणताना आवाजातील चढ – उतार ,लय बध्दता या कडे लक्ष देण्यास सांगावे.
- शिक्षक / पालकांनी पुढील कविता मुलांकडून म्हणून घ्यावी.

ध्वज उंच धरू : ध्वज उंच धरू ध्वज उंच धरू
इवल्या -इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
सैनिक आम्ही या देशाचे ,
सेवक आम्ही या देशाचे
थोर आमच्या परंपरेला मनी स्मरु ,
इवल्या -इवल्या हातांनी ध्वज उंच धरू .

सराव करू या-

- शिक्षक / पालकांनी मुलांना गायनासाठी कविता उपलब्ध करून द्याव्यात .
- वैयक्तिक रित्या कविता तालासुरात साभिनय मुलांकडून म्हणून घ्याव्यात .

१९

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण - संभाषण **संकल्पना- गोष्ट सांगणे**

अध्ययन निष्पत्ती-

- 04 .16 .17 आपल्या कल्पकतेनुसार गोष्ट ,कविता ,वर्णन इत्यादी कथन करतांना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात .
- 04 .16 .01 इतरांकडून सांगितली जाणारी गोष्ट लक्षपूर्वक ऐकून त्यावर आपले मत व्यक्त करतात व प्रश्न विचारतात .

जाणून घेऊ या-

- शिक्षक / पालकांनी गोष्ट सांगतांना मुलांचे अवधान केंद्रीत करावे .
- गोष्ट ऐकल्यानंतर त्यांना गोष्ट सांगण्याची संधी द्यावी .
- दिलेल्या मुद्द्यावरुन गोष्ट तयार करण्यास सांगावी .

मुद्दे - एक गुणी मुलगा ---- बिघडलेल्या मुलाची संगत ----अभ्यासावर परिणाम -----वडिलांचा ओरडा ---- आंब्याची पेटी---- सगळे आंबे सडणे ----बोध .

सक्षम बनू या-

- शिक्षक / पालकांनी गोष्टी सांगताना मुलांच्या उच्चार स्पष्टतेकडे लक्ष द्यावे .
- वर्गात प्रत्येकाला गोष्ट सांगण्याची संधी द्यावी .
- शिक्षक / पालकांनी पाठ्यपुस्तकातील पाठ मुलांना गोष्टी रुपात सांगण्यास सांगावे .

सराव करू या-

- शिक्षक / पालकांनी विविध गोष्टींची पुस्तके मुलांना उपलब्ध करून द्यावीत .
- गोष्टीतील पात्राविषयी बोलण्यास सांगावे .

२०

इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

क्षेत्र –वाचन **संकल्पना –कविता वाचन**

अध्ययन निष्पत्ती – 04 .16 .09 वाचायला उत्सुक असतात आणि वाचन कोपरा /ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्याचे वाचन करतात.

04.16.10 वाचलेल्या रचनांमधील मुख्यविषय ,घटना,चित्र,पात्र ,शीर्षक यांसंबंधी चर्चा करतात .प्रश्न विचारतात .आपले मत व्यक्त करतात.

जाणून घेऊया – शिक्षकांनी / पालकांनी मुलांना पुढील कविता काळजीपूर्वक वाचण्यास सांगावी.व कवितेवर आधारित पुढील प्रश्न विचारावे .

वेडं कोकरू

वेडं कोकरू खूप थकलं...
येताना घरी वाट चुकलं ...
अंधार बघून भलतच भ्यालं...
दमून भागून झोपेला आलं ...
शेवटी एकदा घर दिसलं ...
वेडं कोकरू गोड हसलं ...
डोकं ठेवून गवताच्या उशीत...
हळूच शिरलं आईच्या कुशीत ...

प्रश्न : १)कोकरू का थकलं होत?

२) भ्यालं ..या शब्दाचा अर्थ सांगा .

३)वेडं कोकरू का हसलं ?

४) कोकरू कोणाच्या कुशीत शिरलं ?

सक्षम होऊ या –१)शिक्षकांनी / पालकांनी वरीलप्रमाणे विविध प्रकारच्या कवितांचे वाचन करून घ्यावे.कविता काळजीपूर्वक व आशय समजून घेऊन वाचण्यास सांगावी.कवितेतील शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देण्यास सांगावे.कवितेत आलेल्या नवीन शब्दांकडे लक्ष देण्यास सांगावे.

२) शिक्षकांनी / पालकांनी पुढील कविता वाचण्यास सांगावी व कवितेवर आधारित २ – ३ प्रश्न विचारावेत.



ससा

ससा ससा, दिसतो कसा ?
कापूस पिंजून ठेवलाय जसा !
लाल लाल, डोळे छान,
लहान शेपूट, मोठे कान,
पाला खाऊन फुगतो टूम,
चाहूल लागताच पळतो घूम !



सराव करू या –

- **पुढील कवितेच्या ओळी वाचून चित्र काढा व रंगवा.**
  १) फुलाफुलात फुलपाखरे..
  फुलपाखरांचे रंग सोनेरी..

२१

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**


क्षेत्र- भाषण-संभाषण **संकल्पना- चित्रावरून माहिती सांगणे (चित्रवर्णन)**

अध्ययन निष्पत्ती-

- 04.16.02 ऐकलेल्या साहित्य प्रकारातील विषय , घटना , चित्र , पात्र शीर्षक याविषयी चर्चा करतात , प्रश्न विचारतात आपले मत व्यक्त करतात .

जाणून घेऊ या-

- शिक्षक /पालकांनी मुलांना खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे .
- चित्रावरून माहिती सांगण्यास प्रेरित करावे .



सक्षम बनू या-

- शिक्षक /पालकांनी एखाद्या चित्रावरून माहिती सांगावी .
- चित्रांविषयी मुलांसोबत चर्चा करावी .
- शिक्षक /पालकांनी चित्रावर आधारित मुलांना प्रश्न विचारावे .



उदा . १ चित्र कोणत्या ठिकाणचे आहे ?

२ चित्रात दिसणाऱ्या ठिकाणी तुम्ही कधी गेला आहात का ?

सराव करू या-

- शिक्षक /पालकांनी वेगवेगळे चित्र देऊन त्यावर मुलांना ५-६ वाक्य बोलण्यास सांगावे .

२२

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना- स्वल्पविराम**

अध्ययन निष्पत्ती –

विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक वापर करतात .

जाणून घेऊ या-शिक्षकांनी /पालकांनी ,हे चिन्ह दाखवून या चिन्हाला काय म्हणतात ते विद्यार्थ्यांना विचारावे .उदा.साठी काही वाक्ये द्यावीत .वाक्यात कोणते विरामचिन्ह देणे आवश्यक आहे?ते विचारावे .

उदा . १ . भात चपाती भाजी आमटी असे माझे रोजचे जेवण असते .

२. दादा मला माफ कर .

सक्षम बनू या- शिक्षकांनी /पालकांनी काही वाक्ये फळ्यावर लिहावी .त्या वाक्यांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे .स्वल्पविराम कोठे वापरला गेला ? याबाबत चर्चा करावी .वाक्यांमध्ये स्वल्पविराम केव्हा वापरला जातो ? हे स्पष्ट करून द्यावे .त्याचा वापर करून दाखवावा .

उदा .१ . एकाच जातीचे अनेक शब्द

जाई ,जुई ,चाफा,शेवंती ही सुगंधी फुले आहेत .

२ . वाक्ये छोटी असल्यास

रेवा ,आपण फिरायला जाऊ .

सराव करू या-

शिक्षकांनी /पालकांनी स्वल्पविराम नसलेली वाक्ये विद्यार्थ्यांना द्यावीत .त्याचा सराव करून घ्यावा .पुढील वाक्ये वाचा आणि योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा .१.बाजारातून भेंडी कोबी भोपळा कांदे अशी भाजी आणली .२. पान फूल फळ हे झाडाचे अवयव आहेत . पुढे दिलेल्या विरामचिन्हांपैकी स्वल्पविराम ओळखून गोल कर .

१) ? २) . ३) - ४) ,

२३

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषा अभ्यास **संकल्पना- पूर्णविराम**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.16 विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हाचा (उदा.पूर्णविराम) जाणीवपूर्वक वापर करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाक्यांमधील 'पूर्णविराम' हे चिन्ह असलेले वाक्य ओळखण्यास सांगावे व ते वाक्य पुन्हा लिहावयास सांगावे.

१.अमित माझा मित्र आहे.

२.किती रुबाबदार आहे तो घोडा !

३.वहीची किमंत किती आहे ?

सक्षम बनू या

- शिक्षकांनी/पालकांनी 'पूर्णविराम' असलेली वाक्य सांगून/लिहून 'पूर्णविराम' कोणत्या वाक्याला व कोणत्या ठिकाणी द्यावा हे स्पष्ट करावे.

उदा.मी दररोज शाळेत जातो.

गौरीला मैदानावर खेळायला आवडते.

पोपटाचा रंग हिरवा असतो.

- विद्यार्थी मित्रांनो, वाक्य पूर्ण झाले आहे हे दर्शविण्यासाठी वाक्याच्या शेवटी 'पूर्णविराम' हे विरामचिन्ह वापरले जाते. पूर्णविराम हा '.' या चिन्हाने दाखविला जातो.

उदा. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई आहे.

- विद्यार्थी मित्रांनो, पुढील वाक्यात कोणते विरामचिन्ह द्यावयाचे राहिले आहे ते ओळखून वाक्य पुन्हा लिहा.

१.मी इयत्ता पाचवीत शिकत आहे

सराव करू या

- खालील वाक्यातील 'पूर्णविराम' चिन्ह असलेले वाक्य ओळखून वाक्य पुन्हा लिहा.

१.तू पुण्याला कधी जाणार आहे ? २. मोर हा राष्ट्रीय पक्षी आहे. ३.किती सुंदर बगीचा आहे हा !

- पुढील वाक्यातील योग्य पूर्णविरामाचे वाक्य ओळखून लिहा.

१.तुझे नाव काय आहे. २. भारत माझा देश आहे. ३. किती छान आहे हे फूल.

- पुढील वाक्यात योग्य ठिकाणी 'पूर्णविराम' असलेले वाक्य ओळखून ते वाक्य पुन्हा लिहा.

१.उद्या मी. पुण्याला जाणार आहे २.उद्या मी पुण्याला जाणार आहे. ३. उद्या मी पुण्याला .जाणार आहे

- तुमच्या पाठ्यपुस्तकातील 'पूर्णविराम' असलेली पाच वाक्ये लिहा.

२४

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- जोडशब्द**

अध्ययन निष्पत्ती- वेगवेगळ्या साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात .

जाणून घेऊ या – शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या परिचयातील काही शब्द फळ्यावर /वहीत लिहावेत व असे दोन भिन्न शब्दांपासून बन लेले विद्यार्थांना माहित असलेले शब्द सुचविण्यास सांगावे .उदा. केरकचरा ,पाटपाणी, झाडलोट . असे शब्द तू कुठे वाचले आहेस का ? त्यापैकी तुला आठवतील ते शब्द तू लिहून काढ .

सक्षम बनू या –

१. विद्यार्थ्यांना त्यांच्या भावविश्वातील अपूर्ण जोडशब्द देऊन ते पूर्ण करून लिहिण्यास सांगावे .

२. जोडशब्द का वापरले जातात ? या विषयी विद्यार्थांजवळ चर्चा करून जोडशब्दांचे अर्थ सांगण्यास प्रोत्साहित करावे

.जसे –

१.शेजारपाजार – शेजारी राहणारे

२. सदासर्वदा – नेहमी

३. सरसकट --एकत्रितपणे

४. साधाभोळा – स्वभावाने गरीब

सराव करू या - शिक्षकांनी /पालकांनी मुलांनी वाचलेल्या किंवा वाचनात न आलेल्या उताऱ्यातील जोडशब्द लिहिण्यास सांगावे .जोडशब्द असलेला परिच्छेद निवडून त्यातील जोडशब्द वहीत लिहिण्यास सांगावे .

आज खूप जोराचा वाकडा तिकडा पाऊस पडला .घराच्या आजूबाजूला खूप पाणी साचले होते. कागदाच्या लहान मोठ्या होड्या करून मुले अवतीभवती फिरत होती .पाऊस थांबल्यावर साफसफाई केली.

२५


इयता –पाचवी **विषय – द्वितीय भाषा –मराठी**

क्षेत्र –वाचन **संकल्पना – पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे वाचन**

अध्ययन निष्पत्ती-

04.16. 7 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य,वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक ,प्रसिद्धफलक इ,)यांचे समजपूर्वक वाचन करतात .

जाणून घेऊया -




शिक्षकानी / पालकांनी मुलांना वरील सूचना फलकाचे वाचन करण्यास सांगावे शिक्षकांनी /.पालकांनी सूचना फलकावर आधारित पुढील प्रश्न विचारावे

१) वरील चित्र कोणत्या ठिकाणचे आहे ?
२) चित्रात काय काय दिसत आहे ?
३) सूचनाफलकावर कोणत्या सूचना दिल्या आहेत ?
४) किल्ला चढताना सुरवातीलाच सूचना का दिल्या आहेत?

सक्षम होऊ या – शिक्षकांनी / पालकांनी खालील मजकुराचे मुलांकडून मोठ्याने वाचन करून घ्यावे. वाचताना अडखळल्यास मार्गदर्शन करावे .वाचताना मजकुराचा अर्थ लक्षात घेऊन वाचण्यास सांगावे .वाचून झाल्यानंतर २-३ प्रश्न विचारावेत.



सराव करू या – पुढील मजकूर मोठ्याने वाचा .व समजून घ्या.



२६

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- वाचन **संकल्पना-बातमी वाचन**

अध्ययन निष्पत्ती-

पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक, इत्यादी) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी / पालकांनी विद्यार्थ्यांना पुढील बातमीचे वाचन करायला सांगावे.विद्यार्थ्यांकडून बातमी वाचन झाल्यावर पुढील प्रश्न त्यांना विचारावे.

१. वानरांना खाऊ कोणाकडून मिळाला?
२. वानरांच्या टोळीने कोणाकडे पाहुणचार केला?
३. वानराची टोळी लोकांनी किती वाजता पाहिली?



वानरांच्या टोळीने घेतला
कळसकरांचा पाहुणचार

कळस, ता. ७ : कळस (ता. इंदापूर) येथील मुख्य चौकातील भाजी विक्रेत्यांकडे वानरांच्या टोळीने आज मनसोक्त पाहुणचार घेतला. दुपारी चारच्या सुमारास वानरांच्या टोळीने येथील भाजी विक्रेत्यांच्या स्टॉलवरील पालेभाज्या, फळे आदींवर ताव मारला. घुकेने व्याकुळ असलेल्या या वानरांच्या टोळीला विक्रेत्यांनीही प्रतिकार केला नाही.

बघता-बघता गावातील चार ते पाच भाजी विक्रेत्यांच्या स्टॉलवरील पाहुणचार उरकल्यावर, त्यांना बघण्यासाठी गर्दी केलेल्या बच्चे कंपनीकडून मिळालेला खाऊ त्यांनी प्रेमाने स्वीकारला. वानरांना पाहण्यासाठी बच्चांची मोठी गर्दी झाली. काहींनी घास देण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी फळे विकत घेऊन त्यांना दिली. दरम्यान, गावात वानर दाखल झाल्याची गोष्ट काही वृद्धांना समजल्यानंतर यंदा दुष्काळ पडतोय की काय अशी चिंता व्यक्त केली जात होती. अनेकांनी गावात वानर आल्यावर दुष्काळ येतो असे भाकीत (शास्त्रीय आधार नसलेले) व्यक्त केले.

कळस (ता. इंदापूर) : भाजी विक्रेत्यांच्या स्टॉलवर पाहुणचार घेत असलेले वानर.

सक्षम बनू या

- शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांकडून दिलेल्या बातमीचे वाचन करून घ्यावे व त्यावर आधारित खालीलप्रमाणे प्रश्न विचारावे.

१. बातमीत कोणत्या पक्ष्याचे नाव आले आहे?
२. सुगरण पक्ष्याच्या घरट्याचे कोणते नाव बातमीत आले आहे?
३. सुगरण पक्षी काय बनवण्यात मग्न आहे?
४. बातमीत कोणत्या कवयित्रीचा उल्लेख आला आहे?



जीव झाडाले टांगला...

शिरोली बुद्रुक (ता. जुन्नर) : निसर्गाचे वरदान लाभलेला सुगरण पक्षी सध्या विणीचा हंगाम असल्याने घाटी बनविण्यात मग्न आहे. गवताची एक एक काडी संकलित करून झाडाच्या लवचिक फांदीवर पिलांसाठी घोंसाच्या साहाय्याने आकर्षक खोपे साकारले जाते. विहिरीमध्ये डगवलेल्या झाडावरील हे मनमोहक कलाकृती कोणत्याही अभियंत्याला लाजवेल अशीच असते. ती पाहून आपसूकच कवयित्री बहिणाबाईच्या 'अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, देखा पिलासाठी तिनं, जीव झाडाले टांगला' या ओळी पक्षिप्रेमींच्या ओठांवर येतात.

- शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थ्यांना विविध बातम्यांचे नमुने उपलब्ध करून द्यावेत. बातमीवाचन करताना पुढील मुद्यांचा विचार करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे.

❖ प्रथम बातमीचे शीर्षक वाचून बातमी कशा संदर्भात आहे ते जाणून घ्यावे.
❖ बातमी कोणत्या ठिकाणाची आहे ते पाहावे.
❖ बातमीत फोटो असेल तर तो बातमीसंदर्भात आहे का ते पाहावे.

सराव करू या

- शिक्षकांनी/पालकांनी विविध वर्तमानपत्रातील विविध विषयांच्या बातम्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून दयाव्यात.विद्यार्थ्यांची कुतूहल,संवेदनशीलता जागरूक करण्याचा प्रयत्न करावा.
- विद्यार्थ्यांनी विविध वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे गोळा करून त्याचा संग्रह करावा व त्याचे वाचन करावे.
- विद्यार्थांनी पुढील बातम्यांच्या शीर्षकांचे वाचन करावे .

१) इंदापूर परिसरात पावसाची हजेरी.
२) पुण्यातील डॉक्टरांचा जागतिक सन्मान.

२७

इयत्ता- पाचवी विषय- द्वितीय भाषा-मराठी

क्षेत्र- वाचन संकल्पना- शब्दशोध

अध्ययन निष्पत्ती-

पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धीफलक इ.)याचे समजपूर्वक वाचन करतात.

जाणून घेऊ या :

शिक्षकांनी खालील कृती करून घ्याव्यात.

1) नमुन्यादाखल शब्दशोध पाटी मुलांना दाखवावी
2) मुलांना वारांची नावे शोधण्यास सांगावी.



व	गु	वि	डी	वि	ष	सो	सो	ळे	र
छ	रु	सो	बु	ध	वा	र	म	ष	ग
जा	वा	मं	ग	ळ	वा	र	वा	वा	द
र	र	शु	क्र	वा	र	दा	र	र	ग
र	वि	वा	र	म	झा	रु	वौ	वा	ष
श	ग	नि	ज	नि	घा	वा	ध	वा	सृ
र	स	ग	दी	र	च	रु	नि	वि	ष
र	टै	र	च	र	छ	ध	हौ	श	ष
वा	थ	वा	चा	बु	न	वि	ठु	सो	ब
वा	कि	वा	छ	वा	डी	र	पे	मं	ख
श	नि	वा	र	र	छ	र	तो	र	व

सक्षम बनू या

शिक्षकांनी खालीलप्रमाणे कृती कराव्या.

1) शब्दशोध पाटीत उभे,आडवे,तिरके शब्द कसे शोधावे याचे प्रात्यक्षिक मुलांना दाखवावे.
2) कमीत कमी वेळेत वारांची नावे शोधण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
3) शब्दशोध पाटी कशी वाचावी हे मुलांना सांगून चर्चा करावी.
4) वारांशिवाय मुलांच्या संपर्कात येणाऱ्या विविध शब्दशोध पाट्या उपलब्ध करून घ्याव्या किंवा तयार करता येतील.

सराव करू या :

सुरवातीस मुलांना वैयक्तिकरित्या वार शोधण्याचा सराव द्यावा.

मुलांचे गट करून शब्दशोध पाट्या गटात वाटाव्या.

शब्दशोध पाटीत शब्द शोधण्यास मुलांना वेळ द्यावा व कमीत कमी वेळेत जास्तीत

जास्त शब्द शोधण्यासाठीचा सराव घ्यावा

खालील शब्दशोध पाटीतील उर्वरित किल्ल्यांची नावे शोधा.



पा	गि	हि	ला	बि	दि	रि	गि
वि	सा	पू	र	फा	बि	रि	ना
ड	ना	ला	पु	बि	शि	तुं	ना
हि	भा	रं	मा	व	ड	रा	ग
बि	द	लो	ने	गा	य	गा	रा
र	सिं	री	ह	ण	ब	पि	ज
फि	ह	फि	ग	ग	ब	नि	ग
ना	ग	ड	अ	अ	ड	दि	ड
ड	ड	दि	भि	भा	तो	र	णा

२८

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र – वाचन **संकल्पना- जाहिरात वाचन**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक, इत्यादी) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

जाणून घेऊ या



❖ शिक्षकांनी / पालकांनी दिलेल्या नमुन्यासारख्या जाहिरातीचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे .विद्यार्थ्यांना जाहिरात दाखवून त्यावर आधारीत सूचक प्रश्न विचारावे.

१.पिशवी कशाची बनवलेली आहे ?
२.पिशवीचे कोणतेही एक वैशिष्ट्य सांगा.
३.पिशवी मिळण्याचे ठिकाण कोणते ?
४.कागदी पिशवी वापरल्याने काय टाळता येते ?

सक्षम बनू या



❖ शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना जाहिरात दाखवावी.जाहिरातीचे वाचन करून घ्यावे. विविध प्रश्न विचारून जाहिरात समजली की नाही ते पहावे.

१.ही जाहिरात कशाची आहे?
२.नाटकाचे लेखक कोण आहेत?
३.सार्थक चौथीत शिकत आहे त्याला हे नाटक मोफत पाहता येईल का?
४.नाटकाचे नाव काय आहे?
५.बालकांसाठी तिकिटाचा दर काय आहे?

❖ जाहिरात ही संकल्पना दृढ होण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना पुढील माहिती द्यावी.

- आपला माल किंवा वस्तू प्रदर्शन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी जाहिरात केली जाते.जाहिरातीमुळे जास्त लोकांना वस्तूची माहिती मिळते.त्यामुळे वस्तू जास्तीत जास्त प्रमाणात विकली जाते.
- जाहिरातीत वस्तू किंवा प्रदर्शनाची सगळी माहिती दिलेली असते.
- शिक्षकांनी/पालकांनी विविध प्रकारच्या, विविध विषयाच्या जाहिरातीचे नमुने मुलांना दाखवावे व जाहिरात संकल्पना दृढीकरण करून घ्यावी. उदा.कपडे,फर्निचर,पुस्तके,शिबिरे,क्लासेस.

सराव करू या

❖ शिक्षकांनी/पालकांनी विविध प्रकारच्या जाहिराती वाचनासाठी उपलब्ध करून दयाव्यात.विद्यार्थ्यांकडून खालील कृती करून घ्याव्या.

१.जाहिरातींचे वर्गीकरण करून घ्यावे.
२.जाहिरातीचे वाचन व आकलन करून घ्यावे.
३.जाहिरातीवर आधारित प्रश्नोत्तरे विचारावी.

२९

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषा अभ्यास **संकल्पना- यमक जुळणारे शब्द**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.12 भाषेतील विविध बारकावे उदा.शब्दांची पुनरावृत्ती,लिंग ,वचन इत्यादींविषयी सजग राहून कथन करतात .

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी / पालकांनी पुढील शब्दांचे यमक जुळणारे शब्द /समान उच्चार असणारे शब्द विद्यार्थ्यांना विचारावेत किंवा लिहावयास सांगावेत.उदा. मान – पान ,कान

उदा.१. बाळ- २.गारा- ३. काडी- ४.साय-

सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक कविता ऐकवून किंवा वाक्य सांगून त्यातील नादमय शब्द ओळखायला सांगावे .

उदा. अग्गोबाईss ढग्गोबाईss लागली कळ
ढगाला उन्हाची केवढी झळ!
थोडी न थोडकी, लागली फार!
डोंगराच्या डोळ्याला पाण्याची धार!!

- शिक्षकांनी /पालकांनी समान उच्चार असलेली उदाहारणे सांगावीत. विद्यार्थ्यांना आणखी उदाहारणे विचारावीत व वहीत लिहायला सांगावीत.
- शिक्षकांनी/ पालकांनी विद्यार्थ्यांना पुढील गटातील समान उच्चार असणारे / यमक जुळणारे शब्द शोधायला सांगावे व पुढील तक्त्यात लिहावयास सांगावे .

१) पत्र, कळी ,चाकर, सात, माडी, ससा,भाजी ,मित्र , फळी, नोकर ,वात, वाडी, मासा,ताजी

पत्र							
मित्र							

सराव करू या

- शिक्षकांनी /पालकांनी पुढील उदाहरणांचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा.

अ} पुढील शब्दाचा समान उच्चार असलेला शब्द ओळखून लिहा.

१.काळ- (मळा,माळ,माळा)
२.वडी- (नवी, कडी, बळी)
३. कापड- (कासव, कागद, पापड)

आ} पुढील शब्दगटात समान उच्चार नसलेला शब्द ओळखून लिहा.

१.चाक,ताक,फळ,नाक – ३.कैरी ,वैरी ,फैरी ,पैसे -
२.रवी,फळी, नवी,कवी - ४.मासे,पिसे,दिसे,केळे

इ} तुमच्या पाठ्यपुस्तकातील यमक जुळणारे/ समान उच्चार असणारे शब्द शोधा व ते वहीत लिहा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

३०

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -२

इयत्ता- पाचवी विषय – **द्वितीय भाषा-मराठी**

विद्यार्थ्याचे नाव : - **एकूण गुण १० :**

प्रश्न १. पुढील वाक्यात योग्य ठिकाणी स्वल्पविराम देऊन वाक्य पुन्हा लिहा **गुण-१**

अंजनीच्या दप्तरात पाटी पेन आणि पुस्तिका या वस्तू आहेत.


प्रश्न २. पुढील वाक्यातील पूर्णविराम असलेले वाक्य ओळखून पुन्हा लिहा. **गुण-१**

१. आईने देवपूजेसाठी सुगंधी फुले आणली .

२.आमची शाळा केव्हा सुरू होणार आहे ?

३.बापरे! किती मोठा आहे हा धबधबा.

प्रश्न ३.पुढील विनोद वाचा व प्रश्नाचे उत्तर सांगा. **गुण-१**


शिक्षक : मधू, तू तुझ्या आईचं सगळं ऐकतोस का ?


मधू : गुरुजी, मी तर आई सांगते त्याच्या दुप्पट ऐकतो.

शिक्षक : ते कसं काय ?

मधू : आई जेव्हा मला डब्यातून एक लाडू घ्यायला सांगते, तेव्हा मी चक्क दोन लाडू घेतो.

१.आई मधुरा किती लाडू घ्यायला सांगते?

प्रश्न ४.पुढील कविता वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा . **गुण-२**



असे कसे ?

असे कसे ? असे कसे ?
रात्रीचेच चांदणे दिसे !
असे कसे ? असे कसे ?
मोरालाच सुंदर पिसे !
असे कसे ? असे कसे ?
पाण्यातच झोपती मासे !
असे कसे ? असे कसे ?
आईसारखे कुणी नसे !

१. सुंदर पिसे कोणाची आहेत?----------


२.चांदनी केव्हा दिसते?----------

प्रश्न ५.पुढील मजकूर मोठ्याने वाच . **गुण-१**


वाचा.

वृक्ष आपले मित्र आहेत. ते आपल्याला फळे, फुले, सावली देतात. त्यांची काळजी घेणे व रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे.

प्रश्न ६.पुढील चित्राविषयी दोन सांगा. **गुण-१**



प्रश्न ७. पुढीलपैकी कोणता शब्द जोडशब्द नाही त्या शब्दाला गोल कर. **गुण-१**

१. अवतीभवती २.धागादोरा ३.कावराबावरा ४.नातेवाईक

प्रश्न ८.पुढील शब्दांना यमक जुळणारे शब्द लिहा **गुण-२**

१.वारा---------२. शाळा----------

३१

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण - संभाषण **संकल्पना- नाट्यीकरण**

अध्ययन निष्पत्ती-

- 04 .16 .04 स्वतःचे म्हणणे मांडतांना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात .
- 04 .16 .13 एखाद्या विषयावर बोलतांना शब्दांचे बारकावे .त्यातील अंतर समजून घेतात व बोलतांना शब्दांचा योग्य वापर करतात .

जाणून घेऊ या-

- शिक्षकांनी नाट्यीकरणासाठी एखादा प्रसंग निवडून त्याच्या सादरीकरणासाठी वर्गातील विद्यार्थ्यांची निवड करावी .
- शिक्षक / पालकांनी मुलांना सादरीकरण करण्यास सांगावे .

उदा .१ तुमच्या कुटुंबातील तुमचे बहिण भाऊ इतर सदस्यासोबत एखादा प्रसंग (पाण्याची बचत)सादर करा .

२ वृक्षारोपणाचे महत्त्व या विषयावर एका गटाला सादरीकरण करण्यास सांगावे .

सक्षम बनू या-

- शिक्षकानी / पालकांनी एखाद्या प्रसंगाच्या सादरीकारणा मध्ये सहभागी व्हावे .
- प्रत्येक विद्यार्थ्याला संवाद सादरीकरणाची संधी द्यावी.

उदा. – रामायणातील एखादा प्रसंग घेऊन त्यातील पात्रे मुलांना देऊन सादरीकरण करण्यास सांगावे .

सराव करू या-

- शिक्षक /पालकांनी मुलांना वेगवेगळे विषय देऊन नाटकाचे सादरीकरण करण्यास सांगावे .
- शिक्षक /पालकांनी योग्य त्या ठिकाणी मार्गदर्शन करावे .

३२

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- वाचन **संकल्पना- सूचना फलक**

अध्ययन निष्पत्ती-

पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धीफलक इ.)याचे समजपूर्वक वाचन करतात.

जाणून घेऊ या :

1) शिक्षकांनी कमी मजकूर असलेले विविध सूचना फलक मुलांना दाखवावेत.
2) सूचना फलकात असणारे जोडशब्द वाचताना शब्दांची पुंनरावृत्ती करावी.

सक्षम बनू या :

1) मुलांकडून सूचना फलकाचे वाचन करून घ्यावे.
2) आपल्या आजूबाजूला दिसणारे सूचना फलक दाखवावेत .
3) दाखविलेल्या सूचना फलकात याशिवाय वेगळ्या सूचना टाकता येईल का ? असे प्रश्न विचारून मुलांचा प्रतिसाद घ्यावा



सराव करू या :

1) विविध सूचना फलकांचे नमुने मुलांना उपलब्ध करून द्यावेत व वाचनाचा सराव घ्यावा.
2) वाचलेल्या भागाचे किंवा सूचनांचे आकलन झाले किंवा नाही हे तपासण्यासाठी प्रश्नांची निर्मिती करावी.
3) एखादा विषय देऊन त्यावर आधारित सूचना फलक तयार करण्यास सांगावा. उदा : बागेमध्ये येणाऱ्या सर्वांसाठी सूचना फलक तयार करा.

३३

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण-संभाषण **संकल्पना- संवाद आकलन**

अध्ययन निष्पत्ती-

- 04 .16 .13 एखाद्या विषयावर बोलतांना शब्दांचे बारकावे ,त्यातील अंतर समजून घेतात व बोलतांना शब्दांचा योग्य वापर करतात .

जाणून घेऊ या-

- **शिक्षक/पालकांनी खाली दिलेला संवाद मुलांकडून म्हणून घ्यावा .**
- **संवाद म्हणून घेतांना उच्चार स्पष्टता, आवाजातील चढ-उताराकडे लक्ष देऊन त्रुटी जाणून घ्याव्यात.**

संवाद

झोका : तुझ्या फांदीला बघ झुला मी बांधला.
झाड : पण माझी फांदी म्हणजेच आहे एक झुला.
झोका : खाली-वर , वर-खाली मी झोकात किती झुलतो !
झाड : अरे , पण माझ्यामुळेच तू इतका खुलतो !

सक्षम बनू या-

- **शिक्षक/पालकांनी संवाद आकलना विषयी मुलांशी चर्चा करावी.**
- **मुलांचे गट पाडून संवांद बोलण्यास प्रेरित करावे.**
- **दिलेल्या संवाद सादरीकरणामध्ये मुलांसोबत शिक्षक / पालकांनी सहभागी व्हावे .**

संवाद

नदी : नमस्कार वृक्ष दादा .
वृक्ष : राम राम ताई.
नदी : मी गोदावरी नदी , तुझ्या शेजारूनच वाहते .
वृक्ष : मी आंब्याचे झाड तुझ्या पाण्यानेच मोठा झालोय.
नदी : कस चाललय आयुष्य ?
वृक्ष : काही नाही आता छोटे रोपटे झालंय .

सराव करू या-

- **संवाद साधण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट पाडून त्यांना सरावाची संधी द्यावी.**
- **शिक्षक / पालकांनी सरावासाठी विविध संवाद तयार करावे .**

३४

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषण - संभाषण **संकल्पना- घटनाक्रम सांगणे**

अध्ययन निष्पत्ती-

- 04.16.02 ऐकलेल्या साहित्या प्रकारातील विषय , घटना , चित्र , पात्र , शीर्षक या विषयी चर्चा करतात , प्रश्न विचारतात ,आपले मत व्यक्त करतात .

जाणून घेऊ या-

- शिक्षक / पालकांनी एखादा घटनाक्रम लावून सांगावा.

उदा .दिलेल्या कृतीचा योग्य क्रम सांगा . योग्य क्रम

- शिंप्याकडे माप देणे १. बाजारातून कापड आणणे .
- बाजारातून कापड आणणे २ . शिंपीकडे माप देणे
- कापड शिवणे ३ . कापड मापानुसार कापणे
- कापड मापानुसार कापणे . ४ . कापड शिवणे
- शिक्षक / पालकांनी वेगवेगळ्या कृती देऊन योग्य क्रम सांगण्याची संधी द्यावी .

उदा .दिलेल्या कृतीचा योग्य क्रम सांगा . योग्य क्रम

- देवाला नमस्कार करणे . १ .----------
- आंघोळ करणे . २ .----------
- सकाळी उठणे . ३ .----------
- शाळेत जाणे ४ .----------

सक्षम बनू या-

- शिक्षक / पालकांनी घटनाक्रमाविषयी मुलांशी चर्चा करावी .
- शिक्षक / पालकांनी पुढील घटनाक्रम लावण्यास सांगावे .

उदा : दिलेल्या कृतीचा योग्य क्रम सांगा . योग्य क्रम

- खेळ खेळणे . १ .----------

परिपाठ सादर करणे . २ .----------

- शाळेत जाणे ३ .----------
- अभ्यास करणे . ४ .----------

सराव करू या-

- शिक्षक / पालकांनी वेगवेगळे मुद्दे देऊन योग्य घटना क्रम लावण्यास सांगावे , योग्य त्या ठिकाणी मार्गदर्शन करावे .

३५

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- प्रश्नचिन्ह**

अध्ययन निष्पत्ती-

विविध उद्देशासाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक वापर करतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी/पालकांनी **?** हे चिन्ह मुलांना दाखवून याला काय म्हणतात विचारावे. खालीलप्रमाणे काही वाक्ये फळ्यावर लिहावीत. लिहलेली वाक्ये वाचून या वाक्यांमध्ये कोणती विरामचिन्हे द्यावीत हे विचारावे.

1) आज कोणता वार आहे
2) भारताचा स्वतंत्रता दिवस कधी असतो
3) जंगलाचा राजा कोणाला म्हणतात

सक्षम बनू या

शिक्षकांनी / पालकांनी मुलांना छोटे प्रश्न विचारावेत. प्रश्न विचारल्यानंतर शेवटी कोणते चिन्ह येते याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.

प्रश्नचिन्ह वाक्यात कोठे आणि कधी वापरतात हे शिक्षकांनी स्पष्ट करावे.

विविध प्रश्नार्थक वाक्ये फळ्यावर लिहावी. अशी वाक्ये मुलांना लिहायला सांगून प्रश्नार्थक वाक्य तयार करायला सांगावी.

सराव करू या

शिक्षकांनी/ पालकांनी प्रश्नचिन्ह नसलेली वाक्ये विद्यार्थ्यांना गटात व वैयक्तिकरित्या द्यावीत व सराव करून घ्यावा.

- पुढील वाक्य वाचा व त्यात योग्य विरामचिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिहा.

1) भारतीय राष्ट्रध्वजामध्ये किती रंग असतात
2) आईच्या भावाला काय म्हणतात
3) भारताचे पहिले राष्ट्रपती कोण होते

मुलगा झाडावर का चढला ? या वाक्यात आलेले प्रश्नचिन्ह कोणते ते ओळखा

- पुढीलपैकी कोणत्या वाक्यात प्रश्नचिन्ह आले आहे ते ओळखा व वाक्य पुन्हा लिहा

1) शाब्बास ! उत्तम गुण मिळवलेस.
2) संकेत , आपण घरी जाऊत.
3) तुम्ही संगणकावर काय काय करता ?

३६

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- वाचन **संकल्पना-संवाद वाचन**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक, इत्यादी) यांचे समजपूर्वक वाचन करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना खालील संवाद देऊन, संवाद काळजीपूर्वक वाचण्यास सांगावा.

विद्यार्थ्यांनी संवादाचे वाचन केल्यानंतर शिक्षकांनी/पालकांनी पुढील प्रश्न विद्यार्थ्यांना विचारावे.

१.संवादात किती जणांनी सहभाग घेतला आहे?
२.संवादात मुले आजीला काय करायला सांगत आहे?
३.संवादात आजी मुलांना काय करायला सांगत आहे?

आजी: चला रे मुलांनो , लवकर झोपा आता. खूप उशीर झालाय.


निशा: ए आजी ! तू गोष्ट सांगितल्याशिवाय आम्ही झोपणारच नाही.

मोहित: हो हो. आजी, तू आज कोणती गोष्ट सांगणार आम्हाला?

आजी: अरे देवा ! तुम्ही मुलं ना,सारखा त्रास देत असता मला. हो ना ?

सक्षम बनू या

- शिक्षक/पालकांनी संवादाचे वाचन व आकलन घेताना खालील कृती कराव्यात.
  १. संवाद म्हणजे काय याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.
  २. विद्यार्थी समजपूर्वक वाचन करतात का ? पात्रांचा विचार करून वाचतात का? विरामचिन्हाचा वापर करून योग्य वाचन करतात का? आवाजात चढ – उतार दर्शवतात का? याकडे लक्ष द्यावे.
  ३. संवाद निर्मिती कुठे कुठे होत असते याविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी आणि विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी विविध संवाद उपलब्ध करून द्यावे.



''अभिनंदन प्रकाश!''
''कोण? सचिन ना! ये इकडे.''
''माझ्या बरोबर वर्गातील मित्रही आले आहेत तुझे कौतुक करायला.''
''या ना, आत''
''अरे, स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात १२ वा आला आहेस तू!''
''हो. बाईंनी फोनवरुन कळवलं मला.''
''पण ओमकार माझ्या या यशामध्ये तुमचंही श्रेय आहे.''
''ग्रेट हं प्रकाश! सर्वसामान्य मुलांच्या शाळेत शिकून हे यश मिळवलंस.''
''हे पाहा, मी शाळेविषयी कृतज्ञता पत्र लिहिलंय.''
''बघू अरे, हे तर ब्रेललिपीतील आहे.''
''तूच वाचून दाखव ना!''

- शिक्षक/पालकांनी संवादाचे आवाजातील योग्य चढ – उतारासह आदर्श वाचन करून दाखवावे.विद्यार्थ्यांकडून संवादाचे प्रकटवाचन करून घ्यावे व संवादावर आधारित खालील प्रश्न विचारावे.

१. प्रकाश कोणत्या परीक्षेत राज्यात बारावा आला होता?
२. प्रकाशने ब्रेल लिपीतून पत्र लिहिण्याचे कारण कोणते असू शकते?
३. शाळेविषयी कृतज्ञता पत्र कोणी लिहिले?
४. प्रकाशचा स्कॉलरशीप परीक्षेत नंबर आला हे प्रकाशला कसे कळले?

सराव करू या

- १.शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे संवाद वाचनास उपलब्ध करून द्यावे.
  २.विद्यार्थ्यांकडून संवादाचे प्रकटवाचन घेउन त्यांना त्यावर आधारित प्रश्न विचारावे.

३७

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना-शब्दांवरून माहिती लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

स्वतःच्या इच्छेने किवा शिक्षकांनी ठरवून दिलेल्या कृती अंतर्गत जागरूकतेने व स्वनियंत्रण पद्धतीने लेखन करतात .

जाणून घेऊ या-

शिक्षकानी / पालकांनी विद्यार्थांना स्वतः विषयी माहिती सांगण्यास सांगावे .त्यामध्ये विद्यार्थी स्वतः बद्दल आवड, छंद,खेळ ,वाचन ,रंग ह्याविषयी बोलतील असे पहावे .त्यानंतर सांगितलेल्या माहितीचे अतिशय सोप्या भाषेत लेखन करून घ्यावे .

सक्षम बनू या –

शिक्षकांनी विद्यारथ्यांना वेगवेगळ्या शब्दांविषयी लेखन कसे असावे ह्याविषयी माहिती द्यावी . सुरुवातीस दोन ते तीन सोप्या वाक्यात लेखन आणि अधिक सराव झाल्यावर कल्पकतेने लेखन कसे करता येईल ?त्याविषयी अधिक माहिती कशी लिहिता येईल? असे पहावे .एखाद्या वस्तू किंवा व्यक्ती बाबत लेखन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करावे .उदा.

- पतंग - पतंग आकाशात उडवतात .पतंग विविध रंगी असतो .पंतगाला लांब शेपटी असते .मला पतंग उडवायला आवडतो.
- आजी – माझी आजी प्रेमळ आहे .ती मला रोज छान गोष्ट सांगते.म्हणून मला ती खूप आवडते .

असे शब्दांविषयी माहिती लेखनाचे विविध नमुने विद्यार्थ्याला दाखवावेत .वरील कृती करताना विद्यार्थ्याला सोप्या भाषेत लेखन करण्याची सवय लागेल

सराव करू या –

शिक्षकांनी / पालकांनी मुलांसोबत घरातील वस्तू ,व्यक्ती तसेच आवडत्या विषयांवर गप्पा कराव्यात,नंतर त्याचे लेखन वहीत सोप्या वाक्यात करण्यास सांगावे .

माझा रुमाल ,फुलपाखरू ,रंगीत पेन ,माझी सायकल या विषयांवर लेखन करण्यास सांगावे .

३८

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना- अनुभव लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

4.16.14 स्वत: च्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया समजून घेतात, स्वत:चे लेखन तपासून घेतात, लेखनाची उद्दीष्टे आणि वाचक यानुसार त्यात बदल करतात .

जाणून घेऊ या

मुलांना त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंग इत्यादी बाबींचा विचार करून चित्र दाखावावे व लेखन कृतीकडे घेऊन जावे.
चित्राचे निरीक्षण करण्यास सांगून चित्राचे वाचन करण्यास प्रोत्साहित करावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी /पालकांनी मुलांना लेखन करता येईल अशी चित्र निवडावे व मुलांना दाखवावे.
चित्रवाचन करण्यास प्रोत्साहित करणारे प्रश्न विचारावे.
उदा .



1) हे चित्र नीट बघ, चित्रात काय दिसते ते सांग. 3) आपल्याला पावसात खेळायला आवडते का ?
2) आपल्याला पाणी कोठून मिळते? 4) चित्रात दिसणारे मुले काय करीत आहेत? .....

असे प्रश्न विचारून त्यांची उत्तरे लिहिण्यास सांगावी.
मुलांचे अनुभव लेखनातून व्यक्त व्हावे यासाठी चित्राशी संबधित विषय फळ्यावर लिहावा व त्याविषयी पाच वाक्य तयार करायला सांगणे.

सराव करू या

शिक्षकांनी/ पालकांनी पुढील चित्र विद्यार्थ्यांना दाखवावे .
चित्राविषयी चर्चा करावी.
माझा आवडता सण, माझी दिवाळीची सुटी या विषयावर अनुभव लेखन करण्यास सांगावे .



३९

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- लेखन **संकल्पना-**उतारा व त्यावरील प्रश्न -उत्तरे लेखन

अध्ययन निष्पत्ती- स्वतःच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरविलेल्या कृती अंतर्गत लेखन प्रक्रिया समजून घेतात , स्वतःचे लेखन तपासून घेतात .लेखनाची उद्दिष्टे आणि वाचक यानुसार त्यात बदल करतात .

जाणून घेऊ या - शिक्षकांनी /पालकांनी मुलांसोबत परिसरात साजरे केले जाणारे विविध सण ह्याविषयीची माहिती औपचारिक गप्पांच्या माध्यमातून जाणून घ्यावेत .त्यावर आधारित काही प्रश्न विचारून त्यांची उत्तरे लिहून घ्यावीत .

आपल्या परिसरात अनेक धर्माचे लोक राहतात .प्रत्येक धर्माचे सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरे केले जातात . काही वेळा अनेक धर्माचे लोक एकत्र येऊन एकमेकांच्या सणासाठी शुभेच्छा देतात .

१.आपण कोणकोणते सण साजरे करतो ?

२.तुझ्या आवडीच्या सणादिवशी काय काय करायला आवडेल ?

३. वेगवेगळे धर्म व त्या धर्माचे कोणकोणते सण तुला माहिती आहेत?

सक्षम बनू या- शिक्षकांनी /पालकांनी खालील उतारा देणे ,त्यावर आधारित प्रश्नाची उत्तरे पूर्ण वाक्यात कशी लिहावीत?हे स्पष्ट करतात त्यानंतर वहीत लेखन करण्यास सांगतात .

कचरा ह्या समस्येने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे .प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे समुद्रात राहणाऱ्या जीवांना धोका निर्माण झाला आहे .आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळणे गरजेचे आहे .बाजारात जाताना कागदी किंवा कापडी पिशव्या सोबत न्याव्यात .

१ .आपण कापडी पिशवीचा वापर का करायचा ?

२.प्लास्टिकच्या वापर आपण कसा टाळू शकतो ? तुला काय वाटते ते लिही .

सराव करू या-

पालकांनी /शिक्षकांनी मुलांकडून खालील उताऱ्यावरील प्रश्नांच्या उत्तराचे लेखन पूर्ण वाक्यात करून घ्यावे .

पक्षी वेगवेगळी घरटी झाडांवर बांधतात .कावळा काटक्यांचे घरटे बांधतो .सुगरण वाळलेल्या गवताच्या काड्यांचे घरटे विणते. त्याला खोपा असेही म्हणतात . सुगरण पक्ष्याचा खोपा झाडाच्या शेंड्यावर असतो . सुगरण पक्षी घरट्याच्या आतमध्ये कापूस ,कापड गोळा करून ठेवतात .

१.पक्षी स्वतःचे घर कुठे बांधतात ?

२. सुगरण पक्ष्याच्या घरट्याची माहिती लिही .

४०

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषा अभ्यास **संकल्पना- लिंग**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.12 भाषेतील विविध बारकावे उदा.शब्दांची पुनरावृत्ती,लिंग ,वचन इत्यादींविषयी सजग राहून कथन करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी/पालकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रकारचे शब्द सांगून तो,ती,ते या गटानुसार त्यांचे वर्गीकरण करण्यास सांगावे.

उदा.फळा,उशी,पान,झाड,समई,ससा.

सक्षम बनू या

- शिक्षकांनी/पालकांनी निरनिराळे शब्द विद्यार्थ्यांना सांगून ते शब्द तो,ती,ते शब्द यापैकी कोणत्या गटात बसतात ते स्पष्ट करून सांगावे.

  उदा. ती शाळा,तो टेबल,ते कपाट
- उदाहरणे देताना एका शब्दाला तीनही गटात घेऊन दाखवावे म्हणजे विद्यार्थ्यांना ती संकल्पना पटकन लक्षात येईल.

  उदा.ती गाडी, तो गाडी, ते गाडी यापैकी कोणते योग्य आहे ते विद्यार्थ्यांना विचारावे.
- शिक्षकांनी/पालकांनी पुढील शब्द विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे व ते शब्द तो, ती, ते च्या गटात लिहावयास सांगावे.

  मगर,ऊस,पपई,चाक,घर,नळ,गवत,आगगाडी,मासा,मांजर,कपाट,मोर,आंबा,घंटी,घरटे

तो	ऊस				
ती	मगर				
ते	चाक				

सराव करू या

- विद्यार्थ्यांनी पुढे दिलेल्या शब्दांचे वाचन करावे व तो, ती, ते यापैकी योग्य गटात त्या शब्दांचे लेखन करावे.

  उदा.एडका,भाजी,माकड,मुलगा,फूल,धबधबा,पिशवी,विमान,होडी

तो			
ती			
ते			

- स्वयंपाक घरातील दहा वस्तूंची नावे लिहून त्या वस्तूंचे तो, ती, ते या गटात वर्गीकरण करावे.

४१

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र- भाषा अभ्यास **संकल्पना- एक -अनेक (वचन)**

अध्ययन निष्पत्ती-

04.16.12 भाषेतील विविध बारकावे उदा.शब्दांची पुनरावृत्ती,लिंग ,वचन इत्यादींविषयी सजग राहून कथन करतात .

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी/पालकांनी काही वस्तू दाखवून त्या एक आहेत की अनेक वस्तू हे विद्यार्थ्यांना विचारावे.
  उदा. खुर्ची, भिंती, टोप्या, पुस्तके, पिशव्या, वही, पेन्सिल.
  विद्यार्थ्यांनी पुढील वस्तूंची नावे वाचून ती वस्तू एक आहे की अनेक ते वस्तूच्या नावा खाली लिहावे.

आंबा	फांद्या	पेढा	गोळ्या

सक्षम बनू या

- शिक्षकांनी/पालकांनी वस्तू/चित्र दाखवून एक आहे की अनेक हे विद्यार्थ्यांना विचारावे व त्यातून एक वस्तू व अनेक वस्तू असे वर्गीकरण करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे.
  उदा.सायकल, वाटी,पाट्या, चमचा,पोळ्या,कपाटे कपबशी, डबा,टोपी,काटे,कोंबड्या,खोल्या,होडी,फुलपाखरे,आरसा,मुले,फुगे,मैदान

एक									
अनेक									

- शिक्षकांनी/पालकांनी एक व अनेक यातील फरक स्पष्ट करावा. आणखी उदाहरणे सांगावीत. विद्यार्थ्यांकडून आणखी उदाहरणे विचारावीत व ती वहीत लिहून घेण्यास सांगावी. काही शब्दांचे एक अनेक सारखेच असते, ते बदलत नाही हे उदाहरणे देऊन शिक्षक/पालकांनी स्पष्ट करावे..
  उदा.एक कागद – अनेक कागद **एक बैल – अनेक बैल** **एक दगड – अनेक दगड**
- शिक्षक/पालकानी खालील दिलेल्या वाक्यांसारखी वाक्ये घेऊन एक अनेक फरक स्पष्ट करावा.
  १.आमच्या अंगणात **चिमणी आली**. आमच्या अंगणात **चिमण्या आल्या.**
  २.अथर्वने **गोष्ट वाचली.** अथर्वने **गोष्टी वाचल्या**.

सराव करू या

शिक्षकांनी/ पालकांनी विद्यार्थ्यांकडून खालील उदाहरणाद्वारे सराव करून घ्यावा.

- पुढील वस्तू एक असतील त्या वस्तू अनेक लिहा व अनेक वस्तू असतील तर एक लिहा.
  १) फूल - २) गोटी -
  ३) दरवाजा - ४} नद्या –
  ५) डोळे - ६) रांगा -
- पुढे दिलेल्या शब्दांचे वाचन करून एक अनेक ओळखून योग्य गटात त्यांची नावे लिहा.
  रस्ते,घर,झाडे,दिवे,ससा,चिमणी,मासे,गोष्टी,घोडा,भिंत,खुर्ची,काचा

एक						
अनेक						

- ज्या वस्तूंची एक व अनेक असताना नावे सारखीच असतात अशा १० वस्तूंची नावे लिहा. उदा.चेंडू, केस,देश,

४२

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना- वस्तू विशेष लेखन**

अध्ययन निष्पत्ती-

स्वतःच्या इच्छेने किंवा शिक्षकाने ठरविलेल्या कृती अंतर्गत जागरूकतेने स्वनियंत्रण पद्धतीने लेखन करतात .

जाणून घेऊ या-

शिक्षकांनी / पालकांनी विद्यार्थांसोबत वस्तू विशेष बाबत अधिक माहिती होण्यासाठी गप्पा कराव्यात . जसे की ,

पिवळा – आंबा

गोड – आंबा

मोठा – आंबा

कच्चा – आंबा

अशा प्रकारे वस्तू ,फळे यांना असे शब्द विशेष तयार करून घेण्यास सांगावे .

सक्षम बनू या –

शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थ्यांच्या सोबत वस्तूचे विशेष कसे असतात त्याबाबत चर्चा करावी .

उदा . हिरवे पान ,मोठी काठी ,जाड पुस्तक ,गरीब गाय ,ईमानी कुत्रा,हुशार कावळा ,पाच बोटे ,तिखट मिरची.

ह्यामध्ये ,पान कसे आहे ?पुस्तक कसे आहे ? असे प्रश्न विचारून त्या शब्दाचे विशेष समजून द्यावेत . हिरवे,मोठी ,जाड ,गरीब, ईमानी,हुशार,पाच तिखट असे शब्द त्या वस्तूबाबतची विशेषता सांगणारे आहेत अशा प्रकारच्या शब्दांमधून विद्यार्थ्यांना वस्तू आणि अन्य ह्यासाठी कोणते विशेष शब्द वापरले जातात हे समजण्यास मदत होईल . शब्दांसाठी विशेष शब्द वापरले जातात त्यातून, विशेषणाची पूर्व तयारी होण्यास मदतच होईल .

पुढील वस्तुंचे विशेष लिहिण्याबाबत मार्गदर्शन करावे.

पिटुकला उंदीर,मोठा हत्ती,लाल गुलाब ,शूर शिपाई ,सुंदर फुले ,पाच मुली

सराव करू या –

शिक्षकांनी / पालकांनी विद्यार्थ्यांकडून खाली दिल्याप्रमाणे विशेष गुण असलेल्या वस्तूंची / प्राण्यांची नावे लिही .

सावकाश चालणारा प्राणी –

थंड वस्तू -

गोल वस्तू –

४३

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना- निरोप लिहू या**

अध्ययन निष्पत्ती-

विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना योग्य शब्दांचा वापर ,योग्य वाक्यरचना आणि लेखनाच्या स्वरूपाचा विचार करून व निर्णय घेऊन त्याप्रमाणे लेखन करतात .

जाणून घेऊ या –

पालकांनी /शिक्षकांनी मुलांसोबत निरोपाबाबत गप्पा कराव्यात . तुमच्या घरी आत्तापर्यंत असे निरोप कोणी कोणासाठी दिले असतील त्याबाबत चर्चा करण्यास सांगावी .

उदा. रमा ,

मी बाजारात जात आहे. घराची चावी शेजारच्या जाधव काकूकडे ठेवली आहे .

- आई.

सक्षम बनू या -

शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. समजा ,तुम्ही घरी एकटेच आहात आणि तुम्हाला मित्रांसोबत खेळायला जायचे असेल तर तुम्ही काय करता?तर,शेजारी सांगता आणि असेही सांगता कि,आई तेव्हा तिलाही सांगा मी कुठे आहे .अशा प्रकारचा निरोप ठेवून खेळायला जाता. म्हणजे ,निरोप म्हणजे काय ? हे मुलांना पुन्हा माहिती करून द्यावे .उदा .तुमची आई काही कामानित्ताने बाहेर गेली आहे आणि तुम्हाला मैत्रिणीकडे जायचे आहे त्यावेळी आईला द्यायचा निरोप ----

आई ,

मी सलमाकडे थोड्यावेळासाठी जात आहे .मांजराला दूध-भात घालून झाला आहे .

-चिनू.

सराव करू या –

शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थांकडून खालील कृती करून घ्यावी .

- बाबांना निरोप ,मित्राला निरोप अशा निरोप चिठ्ठ्या तयार कर .
- मी आज शाळेत येऊ शकत नाही .असा निरोप नेमका कोणासाठी असेल ? ते लिही

४४

इयत्ता- पाचवी **विषय- द्वितीय भाषा-मराठी**

क्षेत्र-लेखन **संकल्पना-शुभेच्छा पत्र लेखन**


अध्ययन निष्पत्ती- विविध उद्दिष्टासाठी लेखन करताना योग्य शब्दांचा वापर ,योग्य वाक्यरचना आणि लेखनाच्या स्वरूपाचा विचार करून निर्णय घेऊन त्याप्रमाणे लेखन करतात **.**

जाणून घेऊ या – पालकांनी/ शिक्षकांनी मुलांना विविध शुभेच्छापत्र दाखवावीत.त्याबाबत मुलांना भरपूर बोलू द्यावे .



सक्षम बनू या -- शिक्षकांनी /पालकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छापत्र नेमकी कोणत्या वेळी दिली जातात त्यावर चर्चा करावी .

सण,वाढदिवस ,नवीन वर्ष, वेगवेगळ्या स्पर्धेतील मिळवलेले यश,शिक्षक दिन ,स्पर्धा परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल शुभेच्छा तसेच मित्र,मैत्रीण,शिक्षक ,आपले नातेवाईकांना निरनिराळ्या प्रसंगी शुभेच्छा देतो त्याबाबत मार्गदर्शन करावे .आपल्या पेक्षा वयाने मोठ्या व्यक्तीस आदरपूर्वक शब्दांचा कसा वापर केला जावा ? त्याबाबत मार्गदर्शन करतील .**उदा .शुभेच्छापत्राचे विविध नमुने दाखवतील .**



सराव करू या- पालकांनी /शिक्षकांनी मुलाकडून पुढील कृती लेखन करून घ्याव्यात .

१.रंगभरण स्पर्धेत तुझ्या मित्राचा प्रथम क्रमांक आला म्हणून त्याला शुभेच्छापत्र तयार कर .

२ .सुंदर हस्ताक्षर तुझ्या लहान बहिणीला मिळालेल्या सुयाशाबद्दल तिचे अभिनंदन कर .

४५

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतु अभ्यास चाचणी क्रमांक -३

इयत्ता- पाचवी विषय – **द्वितीय भाषा-मराठी**

विद्यार्थ्याचे नाव : - ---------- **एकूण गुण : १०**

प्रश्न १- पुढील शब्दांतून अनेक वस्तू दर्शविणारा शब्द शोधून लिहा गुण – १

१.गाजर,पडदा,वह्या,खिडकी ----------

प्रश्न २- खाली दिलेल्या विशेष गुणांच्या वस्तूंची दोन नावे लिहा. गुण – १

१. पांढरी ----------

प्रश्न ३- बसस्थानकावर लिहिण्यासाठी कोणत्याही दोन सूचना लिहा. गुण – १

प्रश्न ४- पुढील वाक्याला कंसातील विरामचिन्हापैकी योग्य विरामचिन्ह देऊन वाक्य पुन्हा लिहा. गुण १

१.तुझा आवडता खेळाडू कोणता (? . ,)

प्रश्न ५- तुमच्या मित्राला परीक्षेसाठी शुभेच्छा देणारे वाक्य लिहा. गुण – १

प्रश्न ६- पुढील घटनांचा योग्य क्रम लावा. गुण – १

१.शाळेत जाणे. २. आंघोळ करणे ३. शाळेतून घरी आल्यावर हात पाय स्वच्छ धुणे.

४. सकाळी लवकर उठणे. ५. नाष्टा करणे

प्रश्न ७- तुम्हाला शाळेतून घरी यायला उशीर होणार आहे.त्यासंबंधी आईला निरोप लिहा. गुण – १

प्रश्न ८- पुढील शब्दावरून दोन वाक्य तयार करा . गुण – १

१.कागद

प्रश्न ९- पुढील शब्द तो,ती,ते या गटात योग्य ठिकाणी लिहा. टॉवेल , चांदणी, वर्तमानपत्र गुण – १

तो- ती- ते-

प्रश्न १०-शाळेतील क्रीडास्पर्धेत तुमचा सहभाग याविषयी तुमचा अनुभव सांगा. गुण – १